# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई–४००००५.
**दूरध्वनी :** ०२२ – २२१६ ३९६४ / ६५ / ६९ **फॅक्स :** ०२२–२२१६ ३९७६
**ई–मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेतस्थळ :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. ०८/२०१७–१८

## सन २०१५ चे प्रकरण क्र. १३२

## जाहीर सूचना

### विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत मे. ग्लोबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडने विजेचा व्यापार करण्याचा परवाना मंजूर करण्यासाठी केलेल्या अर्जावर अभिप्राय मागविण्याबाबत

१. मे. ग्लोबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड (जीईपीएल) यांनी, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत महाराष्ट्रात विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्याकरिता त्यांना ''अ'' वर्गवारीतील परवाना मंजूर करण्यासाठी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) अर्ज केला आहे.

२. जीईपीएलने अधिनियमाच्या कलम १५(२) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, लेखी सूचना व हरकती मागविण्यासाठी (१) द फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी), (२) सकाळ टाइम्स (इंग्रजी) (३) पुढारी (मराठी) आणि (४) नवशक्ती (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली होती, परंतु त्यावर कोणत्याही सूचना किंवा हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

३. आयोगाचे सकृत्‌दर्शनी समाधान झाले आहे की, जीईपीएल, पहिल्या वर्षी ५०.०२ दशलक्ष युनिट्स पर्यंत विजेचा व्यापार करण्यास आणि त्यानंतर पाच वर्षाच्या कालावधीत तो ७३.१८ दशलक्ष युनिट्स पर्यंत वाढविण्यास अर्हताप्राप्त आहे. आयोग, विद्युत अधिनियम, २००३ व विनियमांतील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून जीईपीएल यांना मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ आणि त्यामध्ये आतापर्यंत करण्यात आलेल्या सुधारणांतर्गत ''अ'' वर्गवारीतील वीज व्यापारी म्हणून परवाना मंजूर करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

४. जीईपीएलच्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या **www.merc.gov.in / www.mercindia.org.in** या संकेत–स्थळांवर किंवा आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

५. वीज व्यापार परवाना मंजूरीच्या प्रस्तावावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत, (६+१) प्रतींमध्ये, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, आयोगाचे सचिव यांना व्यक्तिश: किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई–मेलद्वारा (फॅक्स : ०२२–२२१६३९७६, ई–मेल : mercindia@merc.gov.in) पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने प्रतिक्रिया दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असल्यास त्यात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी १२.०० वाजता, सेंट्रम हॉल, पहिला मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, परेड, मुंबई – ४०० ००५,** येथे होणाऱ्या सुनावणीच्या वेळी, जेव्हा जीईपीएल यांचा वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक : १ सप्टेंबर, २०१७<br>
ठिकाण : मुंबई

**सचिव**<br>
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**